**प्रतिवादी क्र.१ तर्फे श्री.आर.ई.भुरकापल्ले वकिल यांच्यामार्फत पुढील उलटतपास सुरु.**

**१६.** हे खरे नाही की, आईच्या वतिने साक्ष देण्याचा मला अधिकारी नाही. हे खरे की माझे वडिलांनी मृत्यूपत्रान्वये वादमिळकत माझे आईच्या नावे करुन ठेवले. हे खरे की, त्या मृत्यूपत्राचा नोंदणी क्रमांक १११३/२०१३ असा आहे. हे खरे की, त्या मृत्यूपत्राला मी किंवा माझे भाऊ बहिणींनी उलट घेतलेला नाही. हे खरे की, या मृत्यूपत्राने वादी आज अखेर दावा मिळकतीची मालक व कब्जेदार आहे. हे खरे नाही की, या मालकी आधारे प्रतिवादी क्र. १ यांना वादीने दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन दिले. हे खरे की, आता मला दाखविलेला निशाणी १७/१ लगतच्या खरेदीपत्रावर माझ्या आईच्या निशाणी अंगठा आहे. त्यातील मजकूरा बद्दल मला माहिती नाही. सदर खरेदीपत्रास **निशाणी क्र. ८१** देण्यात येते. वडिलांनी आईच्या नांवे करुन दिलेले मृत्यूपत्र मी दाखल करु शकतो.

**१७.** हे खरे की, दिनांक ०७.०४.२०१५ रोजी सर्वे क्र. २६१/३/४ या जमिनीचे खरेदीपत्र मंचक बोंडगे यांना मी व माझे आईने करुन दिले. हे खरे की, त्याचे क्षेत्रफळ ३४९.५४ चौ.मी आहे. हे खरे नाही की, या खरेदीपत्राचा मोबदला रु.५,००,०००/ रक्कमेचे दोन धनादेश मंचक बोंडगे यांनी वादीच्या लाभात दिले. धनादेश क्रं.००१४९२ रक्कम रु.४,५०,०००/ हा दि.०७/०४/२०१५ रोजी मंचक बोंडगे यांनी माझ्या आईला दिला यास माझे सांगणे की, तो धनादेश या व्यवहारापोटीचा नाही. दि.०८/०४/२०१५ रोजी ००१४९१ हा रक्कम रु.५०,०००/ मंचक बोंडगे यांनी माझ्या आईला दिला हे खरे नाही. हे खरे नाही की, या धनादेशांची रक्कम माझ्या आईच्या खात्यावर जमा झाली व आम्ही ती काढून घेतली. मंचक बोंडगे यांच्या खरेदीपत्रावर माझी सही आहे हे खरे आहे. हे खरे की, या खरेदीपत्राबद्दल एक दावा मी न्यायालयात दाखल केला आहे. हे खरे की, तो दावा सध्या सुरु आहे. दि.०७/०४/२०१५ नंतर मंचक बोंडगे यांच्यासोबत कोणत्याही प्लॉटबद्दल माझा लेखी किंवा तोंडी

व्यवहार झाला नाही हे म्हणणे खरे नाही.

**१८.** हे खरे नाही की, संजय शिवपुजे यांच्यासोबत सर्वे क्रं.२६१/३/४ मधील ३४७.२ चौ.मी क्षेत्राचा व्यवहार झाला. हे खरे नाही की, त्याच दिवशी रु.१०,००,०००/ रक्कमेचा महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा किनगाव यांचा धनादेश प्र.वादी क्रं.१ संजय यांनी माझ्या आईच्या नावे दिला. हे खरे की, फौजदारी खटल्यात माझ्या आईची साक्ष झाली आहे. दि.०८/०४/२०१५ रोजी संजय शिवपुजे आणि माझी आई यांच्यात खरेदीचा व्यवहार तोंडी स्वरुपात रु.१०,००,०००/ मोबदल्यात झाला अशी कबुली माझ्या आईने नि.फौ.ख क्रं. ९८/२०१६ मध्ये दिलेली आहे, हे म्हणणे खरे नाही. आता मला नि.फौ.खटला क्रं.९८/२०१६ मधील माझ्या आईचा जबाब दाखविला त्यामध्ये तसा उल्लेख आहे. त्यास **निशाणी ८४** देण्यात येते हे खरे नाही की, दि.२६/०६/२०१५ रोजी माझ्या आईने सर्वे क्रं.२६१/३/४ मधील जागेचे खरेदीपत्र करुन दिले. मी सांगतो की, तिला फसवूण ते करुन घेतले. हे खरे नाही की, या खरेदीपत्राच्या वेळी मी स्वत:, राम शिंदे, नंदकुमार रोडे, तुकाराम भदाडे असे सगळेजण हजर होते. मी सांगतो की, त्यावेळी मी हजर नव्हतो.

**१९.** हे खरे की, नि.फौ.ख.क्रं.९८/२०१६ माझी साक्ष झाली आहे . आता मला माझ्या साक्षीच्या सही व शिक्याची नक्कल दाखविली त्या साक्षीमध्ये मी "हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीचा मोबदला मला मंचककडून दोन चेकद्वारे रु.५ लाख असा मिळाला होता” असे सांगितलेले आहे. त्यास **निशाणी ८५** देण्यात येते. मंचक बोंडगे यांच्या नावे झालेला फेरफारविरुध्द मी वरिष्ठ महसूली अधिका-यांकडे अपील केलेले नाही. हे खरे नाही की, प्र.वादी क्रं. १ यांच्या नावे मंजूर झालेल्या फेरफारविरुध्द मी कुठेही अपील केलेले नाही. त्याबद्दलची कागदपत्रे मी सादर केलेली आहेत.

**२०.** हे खरे नाही की, प्र.वादी क्रं. १ यांच्या लाभात करुन दिलेल्या खरेदीपत्रात त्यांनी वादींना रु.१० लाख मोबदला दिला व त्या दिवसापासून ते दावामिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. हे खरे नाही की, दावामिळकतीमध्ये आम्हां भावंडाचाही हितसंबंध आहे असे मी खोटे सांगतो. हे खरे की, या दाव्यात

कुठलाच भाऊ, बहीण किंवा मी पक्षकार नाहीत. हे खरे नाही की, वादीला मृत्यूपत्राने आलेली दावामिळकत ही स्वतंत्र मिळकत आहे. हे खरे नाही की, त्यामुळे वादीच्या वतीने जबाब दयायचा मला अधिकारी नाही. हे खरे नाही की, आई या मिळकतीची स्वतंत्र मालक असल्याने तिने सदरचा व्यवहार केला. हे खरे नाही की, त्यामुळे त्या व्यवहाराची माहिती असायचे मला कारण नाही. हे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्रं. १ साठी उलटतपास पूर्ण.**

**प्रतिवादी क्रं. २ तर्फे उलटतपास तहकूब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक:२१/११/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**